Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 12 | Sept - 2015

# मनरेगा योजनेचा भंडारा जिल्हयाच्या ग्रामीण आदिवासी भटक्या जातीतील जनतेच्या दारिद्रयस्तरावर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन

डॉ. कल्पना राऊत
गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख , एस. जी. बी. महिला महाविद्यालय, तुमसर.



## सारांश

वरील संशोधनाचा मुख्य उद्देश शासनाच्या मनरेगा योजनेचा भंडारा जिल्हयाच्या ग्रामीण आदिवासी भटक्या जातीतील जनतेच्या दारिद्रयस्तरावर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे हा होता. संशोधनाकरिता भंडारा जिल्हयातील ग्रामीण आदिवासी भटक्या जातीतील लोकांना देण्यात येणाऱ्या मनरेगाच्या सेवासंबंधी माहिती संकलित करण्यात आली आहे.

प्रस्तुत सशोधनात भंडारा जिल्ह्यातील ०७ तालुक्यामधून प्रत्येकी २५ म्हणजेच एकूण १७५ आदिवासी उत्तरदात्यांकडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला.

## प्रस्तावना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राजाच्या ३३ ग्रामीण जिल्ह्यांमध्ये सन २००८ पासून राबविण्यात येत आहे. सुरूवातीच्या काळात योजना समजून घेण्यामध्ये आणि केंद्रिय कायद्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या. प्रामुख्याने, त्या अडचणी राज्यात मागील ३० वर्षे सुरू असलेल्या राज्य रोहयोच्या पार्श्वभूमीमुळे आल्या, कारण राज्याची रोजगार हमी योजना कार्यान्वयीन यंत्रणामार्फत राबविली जात होती. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये ग्रामपंचायत हा केंद्रबिंदू आहे आणि किमान ५० टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत घेणे आवश्यक आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १,२१,०१,९३,४२२ असून भारतात बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात आहे. देशातील ६२ कोटी जनता ही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण २१.५ टक्के आहे. आणि बेकारीचा दर ७.८ टक्के आहे. देशातील ६५ टक्के जनता ३५ वर्षाखाली असून या सर्वांना रोजगार देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. म्हणून, बेरोजगारांना विविध काम देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यात आल्या व येत आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यामागील सरकारचा उद्देश ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करणे हा असून त्यासाठी २००५ मध्ये केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी २ आक्टोंबर २००६ मध्ये करण्यात आली. या योजनेअंतर्गत नवीन ग्रामीण पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा, रस्ते जोडणी, शाळेच्या ईमारती, तलाव व खेडेगावांना पाणी पुरवठा यासारख्या विकास कामांना चालना मिळेल तसेच ग्रामीण दारिद्र निर्मूलनाकरिता दरवर्षी ग्रामीण भागातील मजूरी करणाऱ्या कुंटूबातील प्रौढ व्यक्तीला वर्षातून १०० दिवस रोजगार देणारी योजना सुरू करण्यात आली.

सुरूवातीला विविध राज्यातील मागासलेल्या १३० जिल्ह्यात ही योजना लागू करण्यात आली असून २००८ मध्ये देशभरातील ग्रामीण क्षेत्राचा विस्तार ३४ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, ६१४ जिल्हे, ६०९६ प्रभाग व २.६५ लाख ग्रामपंचायतीमध्ये ही योजना अंमलात आणली. या योजनेला २ ऑक्टोंबर २००९ रोजी 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' असे नाव देण्यात आले.

## योजनेची पार्श्वभूमी

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियामाची अंमलबजावणी १९७७ पासून महाराष्ट्रात सुरू झाली. राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ नुसार दोन योजना सुरू होत्या.

१. ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना.
२. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम १२ (ई) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना.

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (विद्यमान नाव - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा) लागू केला. केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजुर केला होता; अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती. त्यानुसार महाष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पुर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र, विधिमंडळाने केंद्रिय कायद्यास अनुसरूण राज्यास निधी मिळवण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीत बदल झाला आहे[३२].

आर्थिक नियोजनाच्या काळात भारतात समुदाय विकास कार्यक्रमापासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेचा विकास करणाऱ्या व रोजगार देणाऱ्या निरनिरळ्या योजनांना विशेष महत्व देण्यात आले आहे. त्यामध्ये राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रमाची (NREP) सुरूवात २ आक्टोंबर १९८० मध्ये करण्यात आली. त्यानंतर ग्रामीण भुमीहीन रोजगार हमी कार्यक्रम (IREGP) १५ ऑगस्ट, १९८३ पासुन भुमीहिनांना रोजगार देण्यासाठी सुरू करण्यात आली. राष्ट्रीय ग्रामीण भुमीहीन रोजगार हमी कार्यक्रम यांच्या एकत्रीकरणातून जवाहर रोजगर योजनाची (JRY) सुरूवात १ एप्रिल १९८९ पासून सुरू केली आहे. जवाहर ग्राम समृद्धी योजना (JGSY) व रोजगार आश्वासन योना (EAS) यांच्या एकत्रीकरणातून २५ सप्टेंबर २००१ मध्ये संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनाची (SGRY) निर्मिती झाली. कामाच्या बदल्यात अन्न पुरविणे यासाठी कामासाठी अन्न योजनेची (NFFWP) सुरूवात १४ नोव्हेंबर २००४ पासून सुरू झाली. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY) व कामासाठी अन्न योजना (NFFWP) यांच्या

एकत्रीकरणातून २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सुरूवात करण्यात आली. त्या योजनेला २००९ मध्ये 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' असे नाव देण्यात आले.

**सारणी क्रमांक १ : शासनाच्या मनरेगा योजनेचा लाभ घेण्यासंबंधी भंडारा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांची प्रतिक्रीया**

| महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचा लाभ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १४३ | ८१.७ |
| नाही | ३२ | १८.३ |
| एकुण | १७५ | १०० |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***281.623*** | ***1*** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक १ मध्ये शासनाच्या मनरेगा योजनेचा लाभ घेण्यासंबंधी भंडारा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ८१.७ टक्के आदिवासी उत्तरदात्यांनी शासनाच्या मनरेगा योजनेचा लाभ घेतला असून १८.३ टक्के आदिवासी उत्तरदात्यांनी महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचा लाभ घेतला नाही. शासनाच्या मनरेगा योजनेचा लाभ घेण्यासंबंधी आदिवासी उत्तरदात्यां दरम्यान सार्थक (Chi Squqre = 281.623, df = 1, Sig. <0.05) फरक आहे. बहुतांश आदिवासी उत्तरदात्यांनी शासनाच्या मनरेगा योजनेचा लाभ घेतला असल्याचे दिसून आले.

**सारणी क्रमांक २: शासनाच्या मनरेगा योजनेमुळे आर्थिक स्थितीत लाभ होण्यासंबंधी भंडारा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया**

| योजनेमुळे आर्थिक स्थितीत लाभ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १२९ | ७३.७ |
| नाही | ४६ | २६.३ |
| एकुण | १७५ | १०० |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***157.463*** | ***1*** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक २ मध्ये योजनेमुळे आर्थिक स्थितीत लाभ होण्यासंबंधी भंडारा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ७३.७ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे आर्थिक स्थितीत लाभ झाला असून, केवळ २६.३ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे आर्थिक स्थितीत लाभ झाला नाही. योजनेमुळे आर्थिक स्थितीत लाभ होण्यासंबंधी आदिवासी उत्तरदात्यां दरम्यान सार्थक (Chi Squqre = 157.463, df = 1, Sig. <0.05) फरक असल्याचे निदर्शनास

आले. बहुतांश आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे आर्थिक स्थितीत लाभ झाला असल्याचे दिसून आले.

**सारणी क्रमांक ३: भंडारा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे झालेल्या आर्थिक लाभाच्या स्वरूपासंबंधी माहिती**

| योजनेमुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उत्तम | ३९ | ३०.२ |
| काही प्रमाणात | ६७ | ५२.१ |
| अत्यल्प | २३ | १७.६ |
| **एकूण** | १२९ | १०० |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***93.219*** | ***2*** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये भंडारा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे झालेल्या आर्थिक लाभाच्या स्वरूपासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५२.१ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे काही प्रमाणात आर्थिक लाभ झाला असून ३०.२ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे उत्तम स्वरूपाचा आर्थिक लाभ झाला. तसेच १७.६ टक्के आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे अत्यल्प आर्थिक लाभ झाला असल्याचे निदर्शनास आले. योजनेमुळे झालेल्या आर्थिक लाभाच्या स्वरूपांसंबंधी आदिवासी उत्तरदात्यां दरम्यान सार्थक (Chi Square = 93.219, df = 2, Sig. <0.05) फरक असल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच बहुतांश आदिवासी उत्तरदात्यांना योजनेमुळे काही प्रमाणात आर्थिक लाभ झाला असल्याचे दिसून आले.

## निष्कर्ष

संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की अध्ययन क्षेत्रातील बहुतांश आदिवासी जमातीतील लोकांकडे मनरेगाचा रोजगार कार्ड असून त्यांना कृषि क्षेत्र व इतर क्षेत्रात रोजगार प्राप्त झाले आहे. ज्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा झाली असल्याचे आढळले. मनरेगा योजनामुळे ग्रामीण क्षेत्रातील भटक्या जाती व जमातीतील लोकांना रोजगार प्राप्त झाले असून त्यांच्या आर्थिक स्थितीत देखील सुधारणा झाली असल्याचे आढळले.

## संदर्भग्रंथ सूची

१. महाराष्ट्र शासन नियोजन रोजगार हमी योजना,"महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना – महाराष्ट्रच व राज्य रोजगार हमी योजना". नवीन प्रशासकीय भवन, १६ वा मजला, मंत्रालय, मुंबई पृ. ३.

२. आकरे., बी. एन. (२००९).'आदिवासी जीवनावर सामुदायिक विकास योजनेचा झालेला परिणाम" पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिकर्स, नागपूर प्रथम आवृत्ती, पृ. १०.

३. आगलावे, प. (२०००), 'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे' विद्या प्रकाशन नागपूर.
४. घाटोले र. न.,(१९८९), 'समाजशास्त्रीय संशोधन पद्धती व तत्वे' मंगेश प्रकाशन नागपूर
५. लोकराज्य १ ते ८८ पृ. ६
६. लोकराज्य १ ते ८८ पृ. ६
७. लोकराज्य १ ते ८८ पृ. ७
८. लोकराज्य १ ते ८८ पृ. ७